Impact Factor : 1.4716(UIF)
Volume - 2 | Issue - 1 | Aug - 2015

# शाहीर राम जोशींच्या लावणीतील समाजदर्शन

शांताराम शेलार
नाईट कॉलेज, इचलकरंजी.



**प्रस्तावना :**

लावणी म्हणजे एक प्रकारचे काव्यच. शाहिरांचे भावविश्व लावणीत चित्रित झालेले दिसते. साहित्यातील विश्व हे त्या त्या साहित्यिकाच्या मनातील अभिव्यक्तिचा आविष्कार असतो. त्या व्यक्तिमत्त्वाचा, स्थळांचा, समाजाचा, काळाचा, निसर्गाचा अपरिहार्यपणे साहित्यावर परिणाम होत असतो. साहित्यात इतर गोष्टींचे जसे प्रतिबिंब पडते, तसे लावणीमध्ये सुध्दा शाहिरी वाङ्मयाच्या, उदयाच्या व अस्तापर्यंतच्या काही सामाजिक खुणा प्रतिबिंब म्हणून पडलेल्या दिसतात. राम जोशींच्या लावणीतील समाज जीवनाचे वर्णन पाहता त्यातून विविध अंगाचा परिचय घडतो. त्यांनी समाजातील विविध ढंगाचे, रंगाचे, वर्णन केलेले आढळते.

**1. लावणी मनोरंजनाचा प्रकार :–**

लावणी ज्या काळात रचली जात होती. तो काळ पेशवेकाळ होता. पेशव्यांच्या आश्रयाला शाहीर वाढले. त्यांच्या कवितेतून त्या समाजाचे चित्र आविष्कृत झाले. पण लावणीही मनोरंजनासाठी म्हटली जात होती. त्यातून चरितार्थ चालविणे हे शाहिराचे ध्येय होते. मोहिमेवर गेलेला मराठा शिपाई, संसाराच्या व्यापातून लढाईसाठी धाडस करीत असे. त्याला फावल्या वेळात मनाला वाटलेला विरंगुळा, हा लावणी ऐकण्यातून घालवावा लागे. 'मराठा मर्द गडी' हा 'रंगेल व रगेल' असा रांगड्याा व्यक्तिमत्वाचा शिपाई होय. शिपाई गड्याला डोलवणारी , नृत्यात त्याला झुलविणारी इष्काचा रंग उधळणारी अशी फक्कड लावणी, तालात व विशिष्ट वाद्यांच्या झंकारात म्हटली गेली, की मग शिपाई गडी बेहद् खुश होत असे. लौकिक अर्थाने शाहिरी वाङ्मयातील समाजचित्रण हे लोकमानसाचे व लोकसंस्कृतीचे दर्शन घडविते. त्याचप्रमाणे पौराणिक, अध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक, राजकीय चित्रणही त्यातून घडलेले प्रत्ययास येते. तसाच नैतिक उपदेशही त्यातून मिळतो. शाहिरी वाङ्मयातून जे मनोरंजन घडले जाते, ते लौकिक विषयातून व बहुजन समाजातील विषयाचे स्थूल स्वरुप असते.[१]

राम जोशींची लावणी ही प्रामुख्याने शृंगारिक वर्णनात रंगलेली. मनोरंजनातून चरितार्थ चालविण्याचा त्यांचा एकमेव मार्ग होता. समाजाचे मनोरंजन कसे होईल या दृष्टीने त्यांनी लौकीक विषयावर लावण्या रचलेल्या दिसतात. त्यांच्या लावण्यातून समाजातील चालीरीती, पध्दती, संकेत, वहिवाट इत्यादींचे दर्शन घडते. पण त्यांच्या संस्कृत भाषेच्या वापरामुळे त्यातील कृत्रिमता अधिक जाणवते. त्यामुळे समाजदर्शन व्यवस्थित होण्यास अडचण येते. असे म्हणता येत नाही. राम जोशींच्या लावण्याचे कार्यक्रम कोणकोणत्या स्थळी होत होते. याविषयी माहिती मिळते. त्यावरुन असे दिसते की, पेशवेकालीन पुणे लावणीच्या ढंगात व रंगात डुलत होते.

लावणी रचना कुठे कुठे जात होती ?[२] तर तेही सविस्तर असे स्थळ निर्देश करते. लावणीची रचना इतर ठिकाणी होत होती. मनाला चटका लावणारी लावणी असाच जनसामान्यांचा लावणी विषयी समज असलेला आढळून येतो. लावणी नृत्यातून ऐकली पाहिजे.[३] तर खरी मौज!

रामजोशींनी पंढरपूर, तुळजापूर, गिरीचा व्यंकटेश व बार्शीचा भगवंत इ. चे वर्णन मनोभावे केलेले आहे. तेथील धार्मिक, सामाजिक परिस्थितीची त्यावरुन कल्पना येते. व स्थळांचा परिचय घडतो. श्रीकृष्णांच्या लीलाबद्दल राम जोशींना उत्सुकता होती. गोपी, कृष्ण रासक्रीडा, गोपींचा विरह इ. च्या वर्णनात त्यांनी भागवतातील दशमस्कंधातील कृष्ण वर्णीला आहे. गोवर्धन पर्वत उचलणारा, सवंगड्याबरोबर यमुनेकाठी खेळ खेळणारा, कालीया मर्दन करणारा व निरनिराळ्याा राक्षसांना ठार मारणारा कृष्ण त्यांनी लावणीत वर्णन केला आहे. त्यांच्या लौकीक लावण्यामधून कौटुंबिक परिस्थितीचे वर्णन केलेले आहे.

### समाज जीवन :–

पेशवेकालीन समाज लावणीतून वर्णन केलेले आढळते. त्यावेळच्या चालीरितीच्या, व्यवहाराचा परिचय शाहिरी वाङ्मयातून होतो. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचा काळ हा रंगेल सवरुपाचा होता. नाच तमाशांना दुसरे बाजीराव प्रोत्साहन देत असत. स्वतः दुसरे बाजीराव पेशवे आपल्या वाड्याात बायकांच्या गर्दीत रमलेले दिसतात. नैतिकतेच्या कल्पना त्याकाळी काटे–कोरपणे पाळल्या जात नव्हत्या. तरी पण राम जोशींच्या संदर्भात असे म्हणता येईल की, त्यांनी आजू–बाजूच्या परिस्थितीकडे लक्ष दिलेले दिसत नाही. तेंव्हा एका ठराविक परिसराचा संदर्भ त्यांच्या रचनातून येतो. संबंध समाजजीवन किंवा फक्त पुण्याचे सामाजिक जीवनही त्यांच्या रचनांमधून नेटकेपणाने प्रत्ययाला येत नाही. कौटुंबिक जीवनामधून जो व्यवहार चाललेला दिसतो, तो मर्यादित स्वरुपाचाच होता, असे आढळून येते. सासुरवाशीण स्त्री , एकत्र कुटूंबपध्दती, सद्गृहिनी इ. प्रकारच्या स्त्रियांचे जीवन लौकीक लावण्यांमधून वर्णन केलेल आहे.

परमेश्वराला विसरलेला मानव, रतिसुखात रमू पहातो. सुंदर स्त्रियांच्या दर्शनाने तो मोहीत होतोच, स्त्री संगतीत सदाकाल तो रमलेला दिसतो. राम जोशींच्या लावण्यामधून स्त्री –पुरुषांच्या व्यवसायाचे जे दर्शन घडते, ते संकुचित असेच आहे. पौराणिक लावण्यांमधून गोपी, गवळणी ह्या दही–दूध विकणाऱ्या आहेत. एवढेच स्पष्ट होते. लौकिक शृंगारिक लावण्यामधून जो व्यवसाय निदर्शनास येतो, तो क्वचित प्रमाणात मर्द गड्याच्या मोहिमेचा आहे. स्त्रिया मात्र घरी बसून घरकामाशिवाय कोणताही व्यवसाय करीत नाहीत. तेंव्हा एकूण व्यवसायाच्या संदर्भात रामजोशींची रचना विशेष काही माहिती देत नाही. समाज हा भक्तिप्रधान असेल नसेल पण राम जोशींच्या काही रचनांमधून ‘बार्शीचा भगवंत’, ‘गिरीचा व्यंकटेश’ आणि ‘पंढरपूरचा विठ्ठल’ आणि ‘तुळजापूरची भवानीमाता’ इ. देव–देवतांविषयींची भक्ती दिसून येते, तरी पण केवळ भक्तिभाव स्पष्ट होत नाही किंवा समाजजीवनातून जी विविधता दिसून यायला हवी, ती राम जोशींच्या लावण्यांतून आढळत नाही वैराग्यपर रचनेतही असे दिसते की, मानव परमेश्वराची भक्ती करीत नाही, तर फक्त संसार सुखातच रमण्यात स्वतःला धन्य मानतो.

### 2.लावणीत येणारे जेवणातील पदार्थ :–

राम जोशींच्या लावण्यातून जेवणातील पदार्थाविषयी जी माहिती मिळते ती पुढीलप्रमाणे :-

तेल, तूप, लोणी, लाडू, रोटी, भाकरी, दही–दूध, मेवा, चणा, भगर, नाचणी, खजूर, गूळ, कोळंबी, रवा, भातकेसरी इ. पदार्थांची नावे आढळतात.

### प्रत्यक्ष लावणीतील संदर्भ व तपशील असा :–

| अ.क्र. | तपशील | | |
|---|---|---|---|
| १. | लोण्याचा खादला गोळा | लोणी | ला.क्र. १५ |
| २. | कुणि म्हणती मुलीचा लाडू नेला | लाडू | ला.क्र. १७ |
| ३. | दिली यशोदेने तुपरोटी बांधी पोटी | तुपरोटी | ला.क्र. २१ |
| ४. | दहि—दूध समेटून घरी । नवनीत शेलके हेरी दूध | दहि—दूध | ला.क्र. २१ |
| ५. | जळो तुझा मेवा नको जा बरे | मेवा | ला.क्र. २९ |
| ६ | चणा, भगर, नाचणा ऐकादाधणा मिळे त्यांतुनी | चणा, भगर,नाचणा | ला.क्र. ९९ |
| ७ | पकहो न हो हांक मारिती भाकर द्या म्हणवूनी | भाकर | ला.क्र. ९९ |
| ८ | कधी ऐकिली चिपटी कधि निपट कोळबी चोळवी कधि पाहिली | कोळबी | ला.क्र. ९९ |
| ९ | मणास रुपये तेरा तेलाला बारा तुपा शपथ वाहिली | तेल व तूप | ला.क्र. ९९ |
| १० | गूळ असे तोळाभर आहे की गूळ मीठा चीडली | गूळ, मीठ | ला.क्र. ९९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | गूळ, लवंगा पैशाचा लवंगा मीरची पाच दिधली | गूळ, लवंगा | ला.क्र. ९९ |
| १२ | हुजूरवाणी रुजू तराजू खजूरी एकती | खजूर | ला.क्र. ९९ |
| १३ | हे राहो भाजी बागवान जोडका | भाजी | ला.क्र. ९९ |
| १४ | पैशाचा एकचि मुळा एक दोडका | मुळा दोडका | ला.क्र. ९९ |
| १५ | पैशास मक्याचा कंद एक मोडका | मक्याचा कंठ | ला.क्र. ९९ |
| १६ | हा कांदा हो पैशास एक बोडका | कांदा | ला.क्र. ९९ |
| १७ | भात—केसरी भक्षुनि वाहो सेवे व वरपिती खिरी | भात—केसरी | ला.क्र. १०० |
| १८ | गहु म्हणति जे बहू लवंग ते नऊ चिपटी झाली | गहू | ला.क्र. ९९ |

### *3.लावणीत येणारे खेळाचे प्रकार :–*

राम जोशींच्या लावण्यांमधून विविध खेळांचे, साहित्याचे साधनांचे दर्शन घडते त्यामधून त्या समाजातील खेळातील चालीरिती पहावयास मिळतात. त्याखालीलप्रमाणे खेळांची नांवे आढळतात.

१.विटी दांडू लगोऱ्या गोटी सर्व गोपाळांची दाटी गडबड मोठी विटी, दांडू, लगोऱ्या, गोटी इ. (ला.क्र. २१)
२.दूर होय कान्हा आम्ही तुशी खेळूनी होरी होरी (ला.क्र.२४)
३.नंदकिशोराची होरी जळो बळजोरी पिचकारी माही रंगाची पिचकारी (ला.क्र. २७)
४.तत्कालीन दाग–दागिने व अलंकार :–

*तत्कालीन दागदागिन्यांमध्ये जुन्या पध्दतीचेच दागिने राम जोशींच्या लावण्यातून प्रत्ययास येतात. ती खालीलप्रमाणे :–*

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुंडा भुजदंड सुमंडित ज्याचे । कुंडले लटकती | कुंडल | ला.क्र. ४ |
| २ | हार तुटोनी गळतात मणी धनीपणाचा शिका | हार | ला.क्र. ४ |
| ३ | लगबग, लगबग करिल आजा तिची वेणीफणी मुदराखडी | मुदराखडी | ला.क्र. १४ |
| ४ | हिच्यापुढे मोत्यांची म्यां कंठी नाही आठविली | मोत्यांची कंठी | ला.क्र. १८ |
| ५ | हिजहून गोड वाटे वैजयंती काय माला | वैजयंतीमाळ | ला.क्र. १८ |
| ६ | बुलाख नथ नाक्षिकी चमक जशी शुक्रांची चांदणी | नथ | ला.क्र. २० |
| ७ | मोर मुकुटशिरि करी धरी वेणू | मोरमुगूट | ला.क्र. २२ |
| ८ | काय बहू मूल माझी बुगडी काढून वाली बुगडी | बुगडी | ला.क्र. २६ |
| ९ | मुक्तमणीचे माझ हार गळ्यातील तोडी | मुक्तमणी हार | ला.क्र. २४ |

### 6.वाद्याची नांवे :–

| | | | |
|---|---|---|---|
| १. | वरी चौघडा वाजे अति साजे काहिल मढविली नवी | चौघडा | ला.क्र. ९ |
| २ | आता काय मुरलिया ध्वनी साहू । कुंजवनीची गेली हा हू | मुरली | ला.क्र. १३ |
| ३ | सुरताल पखवाज खंजिरी । मंजरीत बासरी | खंजिरी, बासरी | ला.क्र. २० |
| ४ | बिन अमृत कुंडली कुणी डप सारंगीला घरी | डफ , सारंगी | ला.क्र. २० |
| ५ | मोरचंग झांजरी पतीसंपत्ती नानापरी | झांजरी | ला.क्र. २० |
| ६ | कुणी व्यजन चामरे धरिती, पिचकाऱ्या चिपळ्या किती | चिपळ्या | ला.क्र. २० |
| ७ | कुंजात वाजवी वेणू भोवताल्या चरती धेनू | वेणू | ला.क्र. २१ |
| ८ | टाळ विणे किती रुबाब भेरी वाजे वाजवी | टाळ, वीणा | ला.क्र. १७० |

चौघडा, मुरली, खंजिरी, बासरी, डफ , सारंगी, चिपळ्याा, वेणू , टाळ, वीणा, इ. वाद्ये राम जोशींच्या लावणीमधून निदर्शनास येतात. ढोलकी, कडे, तुणतुणे इ. वाद्याची नांवे त्यांच्या लावण्यामधून आढळत नाहीत. कारण त्यावेळी ती वाद्ये कदाचित वापरात नसावीत.

### 7.नैवेद्यांत येणारे पदार्थ :–

१.पायस मोदक लाडू खोबरे, खडिसाखरेचे रवे । (ला. क्र. ४)
मोदक, लाडू, खोबरे, खडीसाखर इ.
२.दुबळ्ययांची भाकर म्हणे मला ही न्याहारी । भाकरी (ला. क्र. ५)
३.चिंच तिखट, नैवेद्य तेलकट परि सूर झड घालती चिंच, तिखट व तेल (ला. क्र. ८)
मोदक, लाडू, खोबरे, खडिसाखर, भाकरी, चिंच, तेलकट व तिखट नैवेद्य इ. पदार्थ नैवेद्यात येतात.

### 8.देव–दैवते व संत यांची नावे :–

१.आनंद सावता माळी कबिर मोमिणी : संत सावतामाळी, कबीर, मोमीण इ. (ला.क्र. ६)
२.लोह दंड त्या क्षेत्र पंढरी, पुंडरीक चौधरी : पुंडलीक (ला. क्र. ६)
३.तुक्या वाणगट तक्या मारि परि मुक्यापरी : संत तुकाराम (ला. क्र. ६)
४.मिराबाईचा त्याला नान्याला भ्याला ह्याला : मिराबाई, नामदेव (ला. क्र. ६)
५.वसुदेव देवकी नंदादिप झाकली : वसुदेव, देवकी, नंदराज (ला. क्र. ६)
सांवता माळी, कबीर, मोमीण, पुंडलीक , तुकाराम , नामदेव, मीराबाई, इ. संत व वसुदेव देवकी, नंदराजा इ. दैवते होत.

### 9.विविध जातीपंथाचे लोक :–

१.असो महार यातिचा जातीचा हरिच्या भागवतोत्तम कवी ।: महार (ला. क्र. ६)
२.देति मालिणी माळी चित्ती सुका न रिझ आधवी : माळी, मालीन (ला. क्र. ६)
३.तुक्या वाणगट : वाणगट (ला. क्र. ६)
४.येती राऊली अवणेते बडवे यांचे गोप गोपिका घरी : बडवे (ला. क्र. ६)
५.कुतल बुडविले सारे ही वारे वेळची सराफावर लादिली : सराफ (ला.क्र. ६६)
६.सार हिऱ्यात गार म्हणति सोनार देत पावली : सोनार (ला.क्र. ६६)
७.चार शेर तांब्याला का म्याला दाणे कांसार देत आधिली : कांसार (ला.क्र. ६६)
८.प्रयायी यवनांच्या ब्राहण खंदीतच सोडति दधि । : यवन, ब्राहण (ला.क्र. ६६)

महार, माळी, मालीन, वाणगट, बडवे, सराफ, सोनार, कांसार, यवन, ब्राहण, बागवान इ. जातीची नावे आढळून येतात त्यातूनच त्यांच्या व्यवसायावरही प्रकाश पडतो.

### 10.कुटुंब व्यवस्था :–

तत्कालीन कुटुंबव्यवस्था ही एकत्र पध्दतीची होती, असे काही उदाहरणावरुन स्पष्ट होते.
(ला.क्र. ११)

नाहि अब्रूची चाड तुलारे आम्ही गरति बायका ।
किंवा
सासुसासरा घरि घरच्याला कळेल जनामधि टिका
होईल मग अवरुन बसला धका ।

घरंदाज स्त्रिया, कुटुंबाच्या मर्यादा सांभाळून होत्या. गरती, कुलीन, अब्रुच्या स्त्रिंया एकत्र कुटूंबात नांदत होत्या. कुटुंबात बरीच माणसे असावीत. प्रियकरांसाठी स्वतःचे दार संसार सोडणारी स्त्रीही लावण्यामधून आढळते. रामजोशींच्या लावण्यामधून असे निदर्शनास येते की, कुटुंबाच्या मर्यादा ह्या त्याकाळी बंधनकारक होत्या पतीची एकांतात गाठ पडत नाही, म्हणून झुरणारी पत्नीही एकत्र कुटूंबात बंधनकारक रीतिरिवाज पाळत होती, असे दिसते.

### *11. ग्रामनामे :–*

राम जोशींच्या लावण्यामधून ग्रामनामामध्ये प्राचीन नांवे सापडतात. 'गोकुळ', 'मथुरा' ही ती नावे होत. ही नांवे वारंवार येतात.

तिर्थक्षेत्रे म्हणून 'पंढरपूर', 'बारशी', 'तुळजापूर', 'गिरीचा व्यंकटेश' इ. नांवे येतात. 'बार्शी', 'पुणे', 'सोलापूर', इ. प्रकारची शहरांची नांवे येतात. विशेष म्हणजे एखादया वाडीची, खेड्याची नांवे येत नाहीत.

### *12.स्त्रियांची नांवे :–*

स्त्रियांच्या नावात विविधता आढळते, पण नावीन्य मात्र आढळत नाही श्यामा, रमा, चीमा, भिमा, यमा, सखू, चिमणी, चंद्रावली, कुंजलता, मैना, साळू, राधा, भामा, कुब्जा, ठकी व राधी इ. प्रकारची नांवे आढळतात.

### *निष्कर्ष :–*

राम जोशींच्या लावणीतील समाजदर्शन हे मर्यादित स्वरुपाचे आहे. दुष्काळ, होळकर दंगा, पुणे वर्णन, शुक्रवारवाडा, इ. रचनामधून पेशवेकालीन सामाजिक ऐतिहासिक परिस्थिती लक्षात येते.

दासी, व्याभिचारी स्त्री, रांड इ. नावाने संबोधल्या जाणाऱ्या स्त्रिया अनैतिक संबंधाविषयी उघड बोलतात, गरती स्त्रियां कुटूंबाच्या मर्यादा सांभाळून वागतात. तेंव्हा स्त्रियांना कुटूंबात, समाजातही स्वातंत्र्य नव्हते, असे दिसून येते.

स्त्रियांच्या नावांत विशेष नावीन्य नाही, यशोदामाता, राधी, माता इ. स्त्रियांची नामे विशेष नामे म्हणून येतात. जेवणातही पदार्थ, अलंकार, वाद्ये, ग्रामनामे इ. मध्येही प्राचीनतम वैशिष्ट्यो नाहीत तेव्हा राम जोशींच्या लावण्यामधून समाजदर्शन सखोल व व्यापक स्वरुपाचे निदर्शनास येत नाही. त्यामध्ये विशेष प्रकारचे नावीन्य आहे असे वाटत नाही.

### *संदर्भ टिपा :–*

१.शाहिरांनी आपल्या काव्याला विषय निवडले ते बहुजन समाजाला आवडतील असे व प्रामुख्याने त्यांच्याच जीवनातील पण हा बहुजन समाज केवळ खेड्यातील नाही, तो बराचसा शहरांतीलच आहे. यामुळे शाहिरांच्या काव्यात खेडी, खेडूत व त्यांचे शेतीभातीसारखे उद्योग यांची वर्णने नसून तुळजापूर, पंढरपूर सारखी क्षेत्रे, पुणे, कोल्हापूर, सोलापूर यासारखी शहरे, त्यातील सरदार दरकदार त्यांच्या स्त्रिया, रखेल्या व अभिसारिका आणि त्यांचे जीवन यांचीच वर्णने आहेत. या काव्यात शेते, बागा, ओढे, मोटा, जत्रा इ. ग्रामीण स्थळांची वर्णने नसून 'दाट नळ पाण्याचे ठायि ठायि' शोभणी हौद एक फन्यांचे असी शहरांचीच वर्णने आहेत. मऱ्हाटी लावणी : म.वा.धोंड पृ. क्र. ११

२. लावणीची रचना पुण्याच्या परिसराशिवाय विदर्भ, मराठवाडा, नाशिक, नगर, तंजावर आदी भागातही होत होती. : मराठी लावणी वाङ्मयः डॉ. गंगाधर मोरजे पृ. १२४

३. तमाशा सारख्या नाट्याप्रकारातच ती खुलून दिसते. ती नुसती सुरात आणि ठेक्यात म्हणून भागत नाही. ती साभिनय म्हणावी लागते. तरच तिची खरी लज्जत रसिक मनाला कळू शकते. : प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप : प्रा. ह.श्री. शेणोलीकर पृ. क्र.२२३

### *संदर्भ ग्रंथ :–*

१. मोरजे गंगाधर '' मराठी लावणी वाङ्मयः मोघे प्रका.पुणे १९७४
२. धोंड म.वा. ( संपा.) मऱ्हाटी लावणी : मौज प्रका. मुंबई १९५६.
३. देशमुख बी.बी. लावणी वाङ्मयः उद्गम व विकासः साहित्य सेवा प्रका. सातारा.
४. जोग रा.श्री. (संपा.) मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ रा महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे १९७३.
५. य.न.केळकरः तंत कवि तथा शाहीरः प्रका. न.रा.कुलकर्णी पुणे १९६५.
६. अदवंत म.ना. (संपा.) पैंजण, चित्रशाळा प्रका. पुणे १९५४.
७. शाळीग्राम शं.तु. : राम जोशीकृत लावण्या – चित्रशाळा प्रका. पुणे १९७४.
८. डॉ. कुलकर्णी वि.म. : डॉ मोरजे गंगाधरः राम जोशीकृत लावण्या.
९. सौजन्याने : शाहीर रामजोशी चित्रपट पोस्टर (इंटरनेट- चित्र)